C.N.R. No. - MHKO130006762014

रेग्युलर दिवाणी दावा नं. १६१/२०१४ मधील निशाणी क्र. ४० खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१० यांनी त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत प्रतिवादी यांचे कथन असे आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द वाटणीचा दावा दाखल केलेला आहे. सदर कामी प्रतिवादी क्र. १० यांचे विरुध्द एकतर्फा दावा चालावा असा आदेश मे. कोर्टानी मागील तारखेस पारित केलेला आहे. सदर न्यायालयाचा आदेश रद्द होऊन मिळण्याची कारणे खालीलप्रमाणे -

यातील प्रतिवादी क्र. १० हे वयस्कर असून ती अशिक्षीत आहेत. त्यामुळे मे. न्यायालयाचे समन्स मिळालेवर हजर होऊन कैफियत व म्हणणे दाखल करावे लागते यांची माहिती नाही. प्रतिवादी क्र. १० हीस नव-याने स्वतःहुन त्यागलेने त्या एकटयाच रामनगर मौजे सांगाव येथील वडिलार्जीत घरात कायमपणे राहत असल्याने त्यांची मानसिक स्थीती मधल्या काळामध्ये ठीक नव्हती. तसेच प्रतिवादी क्र. १० यांना वार्धक्यामुळे येणारे रक्तदाब, सांधेदुखी असे आजार झालेले आहेत, त्यामुळे प्रतिवादी क्र. १० हिला बाहेर हिंडता फिरता येत नव्हते. त्यामुळे याकामी प्रतिवादी क्र. १० हिस हजर होवुन कैफियत दाखल करणेस साधारणपणे एक वर्षाचा विलंब झालेला आहे. यातील प्रतिवादी क्र.१० हया अशिक्षीत व अडाणी असलेमुळे तिला कायदयाचे ज्ञान नाही. त्यामुळे वेळेत वकीलांना भेटुन माहिती देऊन व कागदपत्रे देऊन याकामी हजर होऊन कैफियत मुदतीत दाखल करणे जमले नाही. प्रतिवादी क्र. १० हिने जाणुनबुजून गैरहजेरी केली व कैफियत देणेचे टाळलेले आहे असे काही घडलेले नाही. सबब, प्रतिवादी क्र. १० विरुध्द एकतर्फा काम चालवणेचा मे. न्यायालयाचा आदेश रद्द होऊन प्रतिवादी क्र. १० यांची कैफियत दाखल करणेस

झालेला साधारणपणे एक वर्षाचा विलंब माफ होऊन प्रतिवादी क्र. १० यांची कैफियत अभिलेखावर घ्यावी अशी विनंती प्रतिवादी क्र. १० यांनी केलेली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तुत प्रतिवादी यांचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. वादी यांचे असे कथन आहे की, अर्जातील मजकुर चुकीचा, पोकळ व बेकायदेशीर आहे. वादी आजरोजी देखील प्रामाणीक ट्रायल करण्यास तयार आहेत. सबब, सदरचा अर्ज रक्कम रुपये १०००/- प्रस्तुत प्रतिवादी क्र.१० वर लादण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही पक्षांचे विरुध्द कथने वाचले असता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थीत होत असून त्याबाबतीत निष्कर्ष चर्चेसह खालीलप्रमाणे मांडण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. १० यांच्या विरुध्द झालेला एक तर्फा आदेश रद्द करण्यात यावा का ? | होकारार्थी. |
| २. | कोणता आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

५. दोन्ही पक्षकांराच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज तसेच अर्जाला दिलेले म्हणणे यांचे आवलोकन केले. अभिलेखाची पडताळणी केला असता दिनांक १७/०६/२०१९ रोजी प्रतिवादी नं. १० यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश झाला आहे. सदर आदेश निशाणी ३७ वर प्रतिवादी क्र. १० यांना समन्सची बजावणी झाली असता ते सदर कामात हजर न झाल्यामुळे पारीत झालेला आहे. प्रस्तुत अभिलेखाची पडताळणी केली असता प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी निशाणी २५ अन्वये मुळ दाव्यात कैफियत दाखल केली आहे. तसेच, निशाणी ३१ खाली सदर दाव्यात मुद्दे दिनांक २९/०८/२०१६ रोजी काढले आहेत. त्यामुळे प्रकरण आता वादीच्या पुराव्यावर लागले आहे. प्रतिवादी नं. १० यांना दाव्यामध्ये निशाणी ३३ खाली आदेशानुसार याकामी पक्षकार केले आहे. त्यानुसार निशाणी १ वर दिनांक ०४/०८/२०१८ रोजी दुरुस्ती केली असून त्याप्रमाणे समन्स पाठविण्यात आले आहे.

६. प्रतिवादी नं. १० यांनी वेळेत याकामी हजर न झाल्याचे कारण त्यांचे अग्यानता व वार्धक्यामुळे विवीध आजारांनी ग्रस्त असल्याचे सांगितले आहे. परंतु, कथनांच्या पृष्ठयार्थ याकामी पुरावा दाखल केला नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ याचे हेतु लक्षात घेता दाव्याची विवीध तजवीज हे पक्षकारांना योग्य न्याय मिळण्यासाठी तसेच त्यांच्यातील वाद मिटवण्यासाठी आहेत. तसेच, वादीने सदर कथनांना जोरदार विरोध दर्शवला नसल्यामुळे तसेच दाव्यामध्ये पक्षकारांचे प्रश्नांचे योग्य ते निरसन होण्याकरीता प्रतिवादी नं. १० यांचे म्हणणे याकामी दाखल होणे आवश्यक आहे. प्रतिवादी नं. १० ने दाव्यात हजर होण्याकरीता एक वर्षाचा विलंब झाल्याचा दिसून येत आहे. सदर विलंब अक्ष्यम नसून प्रस्तुत प्रकरणाच्या निवाडयाकरीता तसेच दोन्ही पक्षकारांच्या सर्व बाबी अभिलेखावर याव्या म्हणुन प्रतिवादी क्र. १० यांना एक संधी देणे न्यायोचित राहील. त्यामुळे सदर अर्ज खर्चासहित मंजुर करण्यात येत असून प्रतिवादी क्र. १० यांनी त्यांची कैफियत व म्हणणे कॉस्ट भरल्यानंतर दाखल करावी. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे -

आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १० यांच्या विरुध्द दिनांक १७/०६/२०१९ रोजी झालेला एकतर्फा आदेश रक्कम रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त ) कॉस्ट वादी यांना देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.१० यांची कैफियत कॉस्ट भरल्यानंतर अभिलेखावर घेण्यात यावी.

Vijaya Narayanrao Katkar

Digitally signed by Vijaya Narayanrao Katkar
Date: 2020.01.18 10:39:22 +0530

दिनांक -१७/०१/२०२०

(काटकर विजया एन.एस)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कागल

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | S. V. Kamble |
| Name of Court | :- | Katkar Vijaya N. S. J.M.F.C. Kagal. |
| Date of Dictation/typed | :- | 17/01/2020 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 17/01/2020 |
| Judgment/order uploaded on | :- | 17/01/2020 |